गुरुवार, दि. २८ मे २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक २६६ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४ 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

## जमीन आमची... निर्णय तुमचा कसा?

# जिवंत असेपर्यंत जमीन देणार नाही : शेतकऱ्यांचा प्रशासनाला थेट इशारा

### समृद्धी महामार्गासाठी शेतकऱ्यांचा एल्गार




**जालना -प्रतिनिधी**

जालना-नांदेड समृद्धी महामार्गाच्या भूसंपादन प्रक्रियेविरोधात आता शेतकऱ्यांचा संताप उफाळून आला असून प्रशासनाच्या विरोधात थेट रणशिंग फुंकण्यात आले आहे. न्यायालयाचे आदेश धाब्यावर, शेतकऱ्यांच्या हक्कांची पायमल्ली आणि अपारदर्शक भूसंपादन प्रक्रिया आम्ही सहन करणार नाही, असा इशारा देत जालना तालुक्यातील हिवर्डी, हस्ते पिंपळगाव, शेवगा, खोडेपुरी या बाधित शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी आणि महसूल विभागाला निवेदन सादर केले आहे. जिवंत असेपर्यंत जमीन देणार नाही, अशी भूमिका घेत दीपक राजेभाऊ दवंडे यांच्यासह बाधित शेतकऱ्यांनी प्रशासनाला थेट आव्हान दिले आहे. या निवेदनामुळे जिल्हा प्रशासनात एकच खळबळ उडाली असून समृद्धी महामार्गाच्या भूसंपादन प्रक्रियेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

या संदर्भात देण्यात आलेल्या निवेदनात शेतकऱ्यांचा आरोप आहे की, संपूर्ण भूसंपादन प्रक्रिया ही कायद्याला हरताळ फासून आणि उच्च न्यायालयाच्या आदेशांचे उल्लंघन करून राबविण्यात आली. न्यायालयाने स्पष्ट आदेश दिल्यानंतरही फेरमूल्यांकन करण्यात आले नाही. राष्ट्रीय महामार्गासाठी लागू असलेला गुणांक-२ लागू करण्यात आला नाही. संयुक्त मोजणीदरम्यान असलेले परिशिष्ट-१६ आणि अंतिम परिशिष्ट-१६ मध्ये खाडाखोड करून जमिनीवरील महत्त्वाचे घटक गायब करण्यात आले. त्यामुळे शेतकऱ्यांचे कोट्यवधींचे नुकसान झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. गावठाण प्रभाव क्षेत्र प्रत्यक्ष न पाहता जुने अहवाल वापरून मूल्यांकन करण्यात आले. मोठ्या लोकांना वेगळा न्याय आणि सामान्य शेतकऱ्यांना वेगळा न्याय का? असा संतप्त सवालही निवेदनातून उपस्थित करण्यात आला आहे. व्यापारी, राजकीय आणि उच्चभ्रू लोकांनी नव्याने खरेदी केलेल्या जमिनींना प्रचंड मोबदला मिळाला, मात्र मूळ शेतकऱ्यांवर अन्याय करण्यात आल्याचा गंभीर आरोप बाधितांनी केला आहे. विशेष म्हणजे, चार वर्षांनंतरही प्रशासन आता शेतकऱ्यांकडून संमती का देत नाही? याचा खुलासा मागत असल्याने संताप अधिक तीव्र झाला आहे. प्रथम चुकीची प्रक्रिया राबवायची, चुकीचे अहवाल तयार करायचे आणि आता आमच्यावर दबाव आणायचा, हा कोणता न्याय? असा सवाल शेतकऱ्यांनी उपस्थित केला आहे. निवेदनात उच्च न्यायालयाच्या निकालांचाही उल्लेख करण्यात आला असून, मुंबई उच्च न्यायालयाने काही निवाडे रद्द ठरवूनही आम्हाला लवादात जाण्यास भाग पाडले जात आहे. अधिसूचनेचा कालावधी संपल्यानंतरही नवीन अधिसूचना न काढता जुन्याच आदेशांवर जमीन ताब्यात घेण्याचा प्रयत्न सुरू आहे, असा आरोप करण्यात आला आहे. शेतकऱ्यांनी प्रशासनाला थेट इशारा देत म्हटले आहे की, चुकीच्या आणि बेकायदेशीर प्रक्रियेद्वारे आमच्या जमिनी बळजबरीने ताब्यात घेण्याचा प्रयत्न झाला, तर आमच्या कुटुंबाच्या जीवितास काहीही झाले तरी त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची राहील. दरम्यान, समृद्धी महामार्गासारख्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी प्रशासन आणि शेतकरी यांच्यातील संघर्ष आता अधिक तीव्र होण्याची चिन्हे दिसत आहेत.

विकासाच्या नावाखाली शेतकऱ्यांना उद्ध्वस्त करण्याचा डाव आम्ही यशस्वी होऊ देणार नाही, असा निर्धार बाधित शेतकऱ्यांनी व्यक्त केला आहे. जिल्हाभरातील शेतकरी संघटना देखील या आंदोलनाच्या पाठीशी उभ्या राहत असल्याने आगामी काळात प्रशासनाविरोधात मोठा संघर्ष पेटण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

या निवेदनावर दीपक दवंडे, सुमन काळे, काशिनाथ काळे, रत्नाकर गायकवाड, श्याम काळे, परमेश्वर पवार, रामकिसन मंडपे, उर्मिला किटाळे, शारदा किटाळे, नारायण बनकर, शरद बोकन, अर्चना भुतेकर, दत्तात्रय भुतेकर, हरिभाऊ भुतेकर, विजय मगर, रुस्तुम मगर, राम मगर, लक्ष्मण मगर, सुमनबाई जाधव, नारायण नानोटे, शोभा भालशंकर, अशोक भालशंकर, गणेश किटाळे, तुळशीदास भुतेकर, संतोष शास्त्री, श्रीकांत गायकवाड, संजय राजकर, एकनाथ भुतेकर, श्याम राजपूत, रामेश्वर भुतेकर, प्रवीण भुतेकर, श्रीरंग भुतेकर, श्रीपाद भुतेकर, पांडुरंग भुतेकर, गणेश भुतेकर, विलास भुतेकर, रामेश्वर खंडागळे आदी शेतकऱ्यांच्या या निवेदनावर स्वाक्षऱ्या आहेत.

## जालना जिल्ह्यातील तलाठी कार्यालयांबाबत जिल्हाधिकाऱ्यांचे कडक निर्देश

### शासकीय किंवा ग्रामपंचायत इमारतीतूनच चालणार कामकाज

**जालना - प्रतिनिधी**

जिल्ह्यातील महसूल प्रशासन अधिक पारदर्शक, गतिमान आणि नागरिकाभिमुख करण्यासाठी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी महत्त्वपूर्ण परिपत्रक जारी केले आहे. यापुढे जिल्ह्यातील सर्व तलाठी (सजा) कार्यालये शक्यतो शासकीय जागेत अथवा ग्रामपंचायत कार्यालयातूनच चालविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच तलाठ्यांनी त्यांच्या उपस्थितीबाबतची माहिती सार्वजनिक फलकावर प्रदर्शित करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

जिल्हाधिकारी कार्यालय, जालना यांच्या प्रशासन-१ विभागामार्फत २० मे २०२६ रोजी जारी करण्यात आलेल्या परिपत्रकानुसार, काही ठिकाणी तलाठी कार्यालये खाजगी किंवा भाड्याच्या जागेत तसेच संबंधित तलाठ्यांच्या सोयीनुसार वेगवेगळ्या ठिकाणी चालविली जात असल्याच्या तक्रारी प्रशासनाकडे प्राप्त झाल्या होत्या. यामुळे नागरिकांना तलाठी नेमके कोठे उपलब्ध आहेत, हे शोधण्यासाठी वेळ आणि पैसा खर्च करावा लागत असल्याचे निदर्शनास आले होते. महसूल प्रशासनाचा कणा असलेल्या तलाठ्यांबाबत स्पष्ट धोरण

परिपत्रकात नमूद केल्याप्रमाणे, ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) हे गावपातळीवरील महसूल प्रशासनाचा महत्त्वाचा घटक असून सातबारा उतारा, विविध दाखले तसेच अन्य महसुली सेवा नागरिकांना वेळेत उपलब्ध करून देण्याची जबाबदारी त्यांच्यावर आहे. त्यामुळे त्यांच्या कार्यालयाचे निश्चित ठिकाण असणे आवश्यक असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

शासकीय जागेला प्रथम प्राधान्य जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार, ज्या ठिकाणी तलाठी कार्यालयाची स्वतंत्र इमारत उपलब्ध आहे किंवा नव्याने बांधण्यात आली आहे, त्या ठिकाणी संबंधित तलाठ्यांनी नियमितपणे त्या कार्यालयातूनच कामकाज करणे बंधनकारक राहणार आहे. याशिवाय ज्या ठिकाणी स्वतंत्र तलाठी कार्यालय उपलब्ध नाही किंवा त्याचे बांधकाम सुरू आहे, त्या ठिकाणी संबंधित गावाच्या ग्रामपंचायत कार्यालयातून महसुली कामकाज चालविण्यास प्राधान्य देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

इतर शासकीय इमारतींचाही पर्याय जर तलाठी कार्यालय अथवा ग्रामपंचायत कार्यालय उपलब्ध नसेल, तर अशा परिस्थितीत इतर कोणत्याही उपलब्ध शासकीय इमारतीतून कार्यालयीन कामकाज चालविण्याची व्यवस्था करण्याचे निर्देश परिपत्रकात नमूद करण्यात (पान २ वर)

### बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर कदीम जालना पोलिसांची धडक कारवाई

## कत्तलीसाठी डांबून ठेवलेल्या २० गोवंशीय जनावरांची सुटका



**जालना : प्रतिनिधी**

आगामी बकरी ईद सणाच्या पार्श्वभूमीवर कत्तलीसाठी बेकायदेशीररीत्या डांबून ठेवलेल्या २० गोवंशीय जनावरांची सुटका करण्यात कदीम जालना पोलिसांना यश आले आहे. मोरंडी मोहल्ला परिसरात मध्यरात्री छापा टाकून पोलिसांनी सात गायी व तेरा बैल असा एकूण सुमारे ६ लाख ९५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून, या प्रकरणी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दिनांक २६ मे २०२६ रोजी रात्री ११ वाजण्याच्या सुमारास मोरंडी मोहल्ला येथील एका वाड्यात गोवंशीय जनावरे निर्दयतेने कोंबून ठेवून त्यांची विनापरवाना कत्तल करण्याची तयारी सुरू असल्याची खात्रीशीर माहिती कदीम जालना पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलीस निरीक्षक जनार्धन शेवाळे यांच्या नेतृत्वाखाली विशेष पथक तयार करण्यात आले. मध्यरात्री छापा; २० जनावरे आढळून आली

त्यानंतर रात्री सुमारे १.३० वाजता दोन पंचांच्या उपस्थितीत मोरंडी मोहल्ला, जुना जालना येथे पोलिसांनी छापा टाकला. या कारवाईदरम्यान एका वाड्यात ७ गायी आणि १३ बैल अशी एकूण २० गोवंशीय जनावरे कोंडून ठेवलेली आढळून आली. जनावरांना कत्तलीच्या उद्देशाने डांबून ठेवण्यात आल्याचा प्राथमिक निष्कर्ष पोलिसांनी नोंदविला आहे.

जवळपास सात लाखांचा मुद्देमाल जप्त

या कारवाईत पोलिसांनी खालीलप्रमाणे मुद्देमाल जप्त केला आहे :

७ गायी (लाल, पांढऱ्या व काळ्या रंगाच्या) अंदाजे किंमत १ लाख ७५ हजार रुपये १३ (पान २ वर)

# तेल कंपन्यांचे कडक आर्थिक धोरण आणि कॅश अँड कॅरी पॅटर्न

### इंधन तुटवड्यामागचे कारण आले पुढे

**जालना - प्रतिनिधी**

राज्यात आणि देशाच्या विविध भागांत सुरू असलेल्या डिझेल तुटवड्यामागे केवळ पॅनिक बायिंग (भीतीपोटी होणारी अतिखरेदी) कारणीभूत नसून, यामागे एक मोठे व्यावसायिक आणि आर्थिक गणित असल्याचे समोर आले आहे. इंडियन ऑईल (), भारत पेट्रोलियम () आणि हिंदुस्तान पेट्रोलियम () या सरकारी तेल कंपन्यांनी पेट्रोल-डिझेल पंप चालकांना () वर्षानुवर्षे देण्यांत येणारी आर्थिक सवलत म्हणजेच क्रेडिट सुविधा (उधारी) अचानक बंद केली आहे. कंपन्यांच्या या कॅश अँड कॅरी (पैसे द्या आणि तेल घ्या) या नव्या कडक धोरणामुळे पंप चालकांसमोर खेळत्या भांडवलाचे ( ) अभूतपूर्व संकट निर्माण झाले असून, पुरवठा साखळी पूर्णपणे कोलमडली आहे.

काय होती क्रेडिट सिस्टीम आणि ती का बंद झाली?

आजवर पेट्रोल पंप चालकांना व्यवसाय सुरळीत चालवण्यासाठी तेल कंपन्या दोन प्रकारच्या क्रेडिट सवलती देत होत्या:

रिव्हॉल्व्हिंग क्रेडिट ( ): यामध्ये पंपांना ३ ते ५ दिवसांच्या उधारीवर इंधनाचा पुरवठा केला जायचा. चालकाने आज घेतलेल्या तेलाचे पैसे ५ ते ६ दिवसांनी भरायचे असायचे.

ड्राफ्ट ऑन डिलिव्हरी ( ): यामध्ये टँकर पंपावर आल्यावर, त्या दिवशी झालेल्या विक्रीचा हिशोब करून दिवसाच्या शेवटी पैसे भरण्याची मुभा असायची.

या सुविधेमुळे पंप चालकांना दररोज ३० ते ५० लाख रुपयांची मोठी रोकड बँक खात्यात बाळगावी लागत नव्हती. मात्र, आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमती वाढूनही देशात किरकोळ बाजारात दर न वाढल्याने तेल कंपन्यांना प्रत्येक लिटरमागे मोठा तोटा सहन करावा लागत आहे. ''जास्त विक्री म्हणजे जास्त तोटा'' ( , ) असे गणित झाल्याने कंपन्यांनी आपली आर्थिक जोखीम कमी करण्यासाठी आणि जुनी थकीत देयके ( ) वसूल करण्यासाठी उधारीची पद्धत थेट स्क्रॅप केली आहे.

ॲडव्हान्स पेमेंटचा नियम आणि चालकांची कोंडी

तेल कंपन्यांनी आता ॲडव्हान्स पेमेंट सिस्टीम सक्तीची केली आहे. नव्या नियमांनुसार, जर पंप चालकाला उद्या डिझेलचा टँकर हवा असेल, तर आज दुपारी २:३० वाजेच्या आत संपूर्ण रक्कम (अंदाजे ₹२५ ते ₹४० लाख) कंपन्यांच्या खात्यात आगाऊ जमा करावी लागते. पैसे जमा झाल्याची खात्री पटल्यानंतरच डेपोमधून टँकर रवाना केला जातो.

यामुळे पंप चालकांसमोर खालील गंभीर अडचणी निर्माण झाल्या आहेत:

अचानक पैशांची चणचण ( ): कोणत्याही सामान्य पंप चालकाकडे दररोज ₹३० ते ₹४० लाख रोख रक्कम बँक खात्यात उपलब्ध नसते. बँकांना सुट्टी असलेल्या दिवशी (शनिवार-रविवार) पैसे भरणे आणि सोमवारसाठी इंधन मागवणे तांत्रिकदृष्ट्या अशक्य होत आहे, ज्यामुळे वीकेंडला पंप कोरडे पडत आहेत.

कमी इंधनाची ऑर्डर: पैशांची उपलब्धता नसल्यामुळे अनेक छोटे आणि ग्रामीण भागातील पंप चालक क्षमतेपेक्षा कमी इंधन मागवत आहेत (उदा. ५ टँकरची गरज असताना पैशांअभावी २च टँकर मागवले जात आहेत).

शेतकऱ्यांची उधारी बंद: ग्रामीण भागात शेतकरी आणि ट्रान्सपोर्ट चालक अनेकदा महिन्याच्या शेवटी किंवा पीक आल्यावर पंपाचे पैसे देतात. आता चालकांना स्वतःच नगदीने तेल खरेदी करावे लागत असल्याने त्यांनी ग्राहकांना उधारीवर डिझेल देणे पूर्णपणे बंद केले आहे.

पेट्रोलियम डीलर्स असोसिएशनचा दुजोरा आणि मुख्य कारणे

पेट्रोलियम डीलर्स असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी या परिस्थितीला दुजोरा दिला असून, हे संकट डिझेल संपल्यामुळे आलेले नसून ते एक कृत्रिम आणि तात्पुरती तांत्रिक समस्या असल्याचे म्हटले आहे. या संकटाची तीन मुख्य कारणे खालीलप्रमाणे आहेत:

खाजगी विरुद्ध सरकारी दरांमधील प्रचंड तफावत: जिओ-बीपी (-) आणि नायरा () यांसारख्या खाजगी कंपन्यांचे डिझेल सरकारी कंपन्यांच्या तुलनेत प्रति लिटर तब्बल ₹३५ ते ₹४० रुपयांनी महाग विकले जात आहे. त्यामुळे मोठे ट्रान्सपोर्टर्स, कारखाने, एसटी महामंडळ आणि खाजगी ट्रॅव्हल्स

## जालना जिल्हा परिषदेवर भगवा फडकवा

### मराठवाड्यात खासदार डॉ. शिंदेंचा झंझावाती शिवसंवाद दौरा



**जालना - प्रतिनिधी**

जालना जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांवर शिवसेनेचा भगवा फडकला पाहिजे, यादृष्टीने शिवसेना कार्यकर्ते पदाधिकाऱ्यांनी आतापासून कामाला लागा, असे निर्देश शिवसेना संसदीय पक्षाचे नेते संसदरत्न खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी दिले. खासदार डॉ. शिंदे शिवसंवाद दौऱ्याच्या निमित्ताने आज जालना जिल्ह्यातील जालना, भोकरदन, बदनापूर, घनसावंगी आणि परतूर विधानसभा मतदार संघांचा आढावा घेतला. यावेळी खासदार संदीपान भुमरे, मंत्री संजय शिरसाट, आमदार अर्जुन खोतकर, आमदार अब्दुल सत्तार, शिवसेना सचिव भाऊसाहेब चौधरी, माजी खासदार आनंद परांजपे आणि हजारोंच्या संख्येने कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते. सकाळी जालना शहरात झालेल्या बैठकीत खासदार डॉ. शिंदे म्हणाले की मराठवाड्यातील मतदार शिवसेनेसोबत आहे. शिवसेना मुख्य नेते एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना मराठवाड्यात अनेक योजना आणि (पान २ वर)

## संपादकीय पान

### जालना ड्राय पोर्टची शिट्टी वाजली; मराठवाड्याच्या औद्योगिक भविष्याला नवी दिशा

जालना येथील मल्टी मॉडेल लॉजिस्टिक्स पार्क (एमएमएलपी) अर्थात ड्राय पोर्टमध्ये पहिल्या ट्रायल कंटेनर रेकचे यशस्वी आगमन ही केवळ एक प्रशासकीय किंवा तांत्रिक घटना नाही, तर मराठवाड्याच्या आर्थिक इतिहासातील महत्त्वाचा टप्पा आहे. अनेक वर्षांपासून औद्योगिक विकासाच्या स्पर्धेत मागे राहिलेल्या मराठवाड्यासाठी हा प्रकल्प नवी आशा निर्माण करणारा ठरू शकतो. रेल्वे, रस्ता आणि बंदर यांना जोडणारी आधुनिक मालवाहतूक साखळी आता प्रत्यक्षात आकार घेत असल्याने या प्रदेशाच्या औद्योगिक क्षमतेला नवे पंख मिळण्याची शक्यता आहे.

**केवळ ड्राय पोर्ट नव्हे, तर विकासाचे प्रवेशद्वार**

मराठवाडा हा कृषीप्रधान प्रदेश असला तरी जालना, औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर), बीड, परभणी आणि नांदेड या जिल्ह्यांमध्ये औद्योगिक विकासासाठी मोठी क्षमता आहे. जालना जिल्हा स्टील उद्योग, बियाणे उद्योग आणि कृषी-आधारित उत्पादनांसाठी देशभर ओळखला जातो. मात्र, मालवाहतुकीचा वाढता खर्च, बंदरांपासूनचे अंतर आणि लॉजिस्टिक सुविधांचा अभाव यामुळे अनेक उद्योगांना स्पर्धात्मक अडचणींचा सामना करावा लागत होता.

एमएमएलपीमुळे ही परिस्थिती बदलण्याची चिन्हे दिसत आहेत. कंटेनर थेट रेल्वेमार्गाने जालना येथे येणार असल्याने उद्योगांना मालवाहतुकीसाठी मुंबई किंवा इतर बंदर परिसरात जाण्याची आवश्यकता कमी होईल. वेळ, खर्च आणि प्रक्रियात्मक गुंतागुंत यामध्ये मोठी बचत होण्याची शक्यता आहे.

**'पीएम गतिशक्ती'चा स्थानिक परिणाम**

केंद्र सरकारच्या 'पीएम गतिशक्ती' योजनेचा उद्देश देशातील पायाभूत सुविधांना परस्पर जोडणे हा आहे. जालना एमएमएलपी हे त्या धोरणाचे प्रत्यक्ष उदाहरण म्हणता येईल. राष्ट्रीय महामार्ग, रेल्वे नेटवर्क आणि जवाहरलाल नेहरू बंदर यांना जोडणारी व्यवस्था निर्माण झाल्याने लॉजिस्टिक क्षेत्रात क्रांतिकारी बदल होऊ शकतो.

भारतातील लॉजिस्टिक खर्च हा विकसित देशांच्या तुलनेत अधिक असल्याचे अनेक अभ्यास दर्शवतात. उत्पादन खर्चातील हा अतिरिक्त भार उद्योगांच्या स्पर्धात्मकतेवर परिणाम करतो. जालना ड्राय पोर्टसारखे प्रकल्प हा खर्च कमी करण्यास मदत करतील, अशी अपेक्षा आहे.

**उद्योगांसाठी सुवर्णसंधी**

पहिली कंटेनर रेक पोलाद स्टील कंपनीसाठी स्पंज आयर्न घेऊन दाखल झाली, ही बाब प्रतीकात्मकदृष्ट्या महत्त्वाची आहे. याचा अर्थ उद्योगांनी या सुविधेचा वापर सुरू केला आहे. भविष्यात स्टील, बियाणे, कृषी प्रक्रिया, ऑटोमोबाईल घटक, वस्त्रोद्योग आणि निर्यातक्षम उत्पादन करणाऱ्या उद्योगांसाठी ही सुविधा अत्यंत उपयुक्त ठरू शकते.

विशेषतः सीमाशुल्क विभागाची मान्यता मिळाल्यामुळे आयात-निर्यात प्रक्रियेसाठी आवश्यक असलेली अनेक कामे स्थानिक पातळीवर पूर्ण करता येतील. त्यामुळे उद्योजकांचा वेळ आणि खर्च दोन्ही कमी होईल.

**रोजगार आणि गुंतवणुकीची अपेक्षा**

मोठ्या लॉजिस्टिक पार्कचा सर्वात मोठा फायदा म्हणजे रोजगारनिर्मिती. गोदाम व्यवस्थापन, वाहतूक, कंटेनर हाताळणी, माहिती तंत्रज्ञान, सुरक्षा, दुरुस्ती सेवा आणि पूरक उद्योग अशा विविध क्षेत्रांमध्ये रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होऊ शकतात.

याशिवाय, आधुनिक लॉजिस्टिक सुविधा उपलब्ध असलेल्या भागांकडे गुंतवणूकदार अधिक आकर्षित होतात. त्यामुळे मराठवाड्यात नव्या औद्योगिक प्रकल्पांची शक्यता वाढू शकते. विशेषतः औद्योगिकदृष्ट्या विकसित होत असलेल्या जालना-छत्रपती संभाजीनगर पट्ट्याला याचा मोठा लाभ मिळू शकतो.

**मात्र आव्हानेही तितकीच महत्त्वाची**

कोणताही मोठा प्रकल्प केवळ उद्घाटनाने यशस्वी होत नाही. त्याची खरी कसोटी नियमित वापर, उद्योगांचा प्रतिसाद आणि सेवा गुणवत्तेमध्ये असते. कंटेनर वाहतूक नियमित राहणे, रेल्वे वेळापत्रकाची कार्यक्षमता, पुरेशी वेअरहाऊस सुविधा, डिजिटल व्यवस्थापन आणि उद्योगांना स्पर्धात्मक दरात सेवा उपलब्ध करणे ही मोठी आव्हाने असतील.

तसेच, स्थानिक उद्योगांना या सुविधेची माहिती देणे, लघु व मध्यम उद्योगांना जोडणे आणि संपूर्ण मराठवाड्याला या प्रकल्पाशी जोडणारी पूरक पायाभूत सुविधा विकसित करणे आवश्यक ठरेल.

**भविष्यातील दिशा**

जालना एमएमएलपी हा केवळ एका जिल्ह्याचा प्रकल्प नाही. तो संपूर्ण मराठवाड्याच्या आर्थिक परिवर्तनाचा आधारस्तंभ ठरू शकतो. जर या सुविधेचा प्रभावी वापर झाला, तर मराठवाडा केवळ कृषीप्रधान प्रदेश न राहता निर्यातक्षम आणि लॉजिस्टिकदृष्ट्या सक्षम औद्योगिक केंद्र म्हणून उदयास येऊ शकतो.

पहिल्या ट्रायल कंटेनर रेकने विकासाची शिट्टी वाजवली आहे. आता गरज आहे ती सातत्यपूर्ण नियोजन, उद्योगांचा सहभाग आणि प्रशासनाच्या सक्रिय पाठपुराव्याची. हे साध्य झाले तर जालना ड्राय पोर्ट हा केवळ मालवाहतुकीचा प्रकल्प न राहता मराठवाड्याच्या आर्थिक पुनरुत्थानाचा टर्निंग पॉइंट ठरू शकतो.

# राज्याच्या राजकारणात नवी उलथापालथ?

नवीन १६ विधान परिषद आमदारांमुळे महायुतीला विधान परिषदेत मजबूत बहुमत मिळेल. पावसाळी अधिवेशनापूर्वी शपथ घेतल्यानंतर विधेयके पास करणे सोपे होईल. मविआसाठी पुनरुज्जीवनाची ही आयती संधी आहे. स्थानिक राजकारणाचे भविष्य यामुळे ठरणार आहे.



महाराष्ट्राच्या राजकीय पटावर पुन्हा एकदा विधान परिषद निवडणुकीचे ढग दाटले आहेत. ही निवडणूक केवळ १६ जागा भरण्याची नाही, तर महाराष्ट्राच्या स्थानिक राजकारणाचे संतुलन, विकासाचा प्राधान्यक्रम आणि सत्ताधारी महायुती विरुद्ध विरोधक महाविकास आघाडी यांच्यातील शक्तिपरीक्षण ठरणारी आहे. दीर्घकाळ रिक्त जागांमुळे शेतकरी, सहकार, शहरी विकास आणि ग्रामीण समस्या विधान परिषदेत प्रभावीपणे मांडल्या गेल्या नाहीत. आता नवीन आमदारांकडून मोठ्या अपेक्षा आहेत.

विधान परिषद ही राज्याची वरिष्ठ सभा असून, येथील सदस्य अप्रत्यक्ष निवडणुकीद्वारे निवडले जातात. राज्यातील ७८ सदस्यांपैकी २२ सदस्य स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मतदारसंघातून निवडले जातात. यापैकी १६ जागा साडेचार वर्षांहून अधिक काळ रिक्त होत्या. आता निवडणूक आयोगाने १८ मे २०२६ रोजी या १६ जागांसाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर केला आहे. **इतका उशीर का झाला?**

कोरोना महामारी, ओबीसी आरक्षण विवाद, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लांबणीवर पडणे आणि न्यायालयीन प्रक्रिया यामुळे या जागा २०२२ पासून रिक्त राहिल्या. अनेक आमदारांचा कार्यकाळ २०२२ मध्ये संपला, तर काही २०२४ मध्ये. यामुळे जिल्हा परिषद, महापालिका, नगरपालिका आणि पंचायत समित्यांच्या विकासकामांना प्रतिनिधित्व मिळाले नाही. २०२५-२६ मध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पूर्ण झाल्याने आता ७५ टक्के मतदार संख्या पूर्ण होऊन निवडणूक शक्य झाली आहे.

मतदारसंघ आणि मतदार संख्या

या निवडणुकीत सोलापूर (५९५), अहमदनगर (४६१), ठाणे-पालघर (१०५४), जळगाव (५२६), सांगली-सातारा (८५३), नांदेड (४३२), यवतमाळ (४०५), पुणे (७९८), भंडारा-गोंदिया (४५७), रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग (९४७), नाशिक (५८१), वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली (९७७), अमरावती (४५३), धाराशिव-लातूर-बीड (१०५१), परभणी-हिंगोली (४६८), छत्रपती संभाजी नगर-जालना (५८०) आणि नागपूर (७६१) या मतदारसंघांचा समावेश आहे. मतदार हे महापालिका नगरसेवक, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सभापती इत्यादी आहेत.

भूतकाळातील चित्र

या मतदारसंघांत पूर्वी राष्ट्रवादी, भाजप, शिवसेना आणि काँग्रेस यांच्यात कडवी लढत झाली. सोलापूरमध्ये प्रशांत प्रभाकर परिचारक (भाजप समर्थित) यांनी शेतकरी मुद्द्यांवर सक्रिय भूमिका घेतली. पुण्यात अनिल शिवाजीराव भोसले (राष्ट्रवादी) यांचा काळ सहकार आणि शहरी विकासाशी जोडला गेला, मात्र घोटाळ्यांच्या चर्चेने प्रभावित झाला. अहमदनगरमध्ये अरुणकाका जगताप, जळगावमध्ये चंदूभाई पटेल, अमरावतीमध्ये प्रवीण पोटे यांनी दीर्घकाळ प्रतिनिधित्व केले. मागील निवडणुकांत ९० टक्क्यांहून अधिक मतदान आणि काही ठिकाणी क्रॉस व्होटिंगमुळे अनपेक्षित निकाल लागले होते.

सध्याचे राजकीय समीकरण

२०२४ च्या विधानसभा निवडणुकीनंतर महायुती (भाजप, शिंदे सेना, अजित पवार गट) सत्तेत आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत भाजप आणि सहयोगी पक्षांनी चांगली कामगिरी केली. यामुळे या विधान परिषद निवडणुकीत महायुतीचे वर्चस्व राहण्याची शक्यता प्रबळ आहे. महाविकास आघाडी (काँग्रेस, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे, राष्ट्रवादी श.प.) क्रॉस व्होटिंग टाळण्याचा आणि काही जागांवर आश्चर्य घडवण्याचा प्रयत्न करेल. अर्ज भरणे अद्याप सुरू नसल्याने अंतिम नावे स्पष्ट नाहीत, पण चर्चा जोरात आहे. महायुतीकडून स्थानिक जिल्हा परिषद संभाव्य उमेदवार आणि रणनीती अध्यक्ष, महापालिका नेते, सहकार क्षेत्रातील प्रभावशाली व्यक्तींना संधी मिळण्याची शक्यता. ठाणे, पुणे, नाशिक, विदर्भात भाजपची मजबूत पकड. एकनाथ शिंदे गट आणि अजित पवार गट यांच्यात समन्वय साधला जाईल. मविआकडून शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) आणि राष्ट्रवादी (श.प.) सक्रिय असतील. काँग्रेस काही जागांवर सपोर्ट देऊ शकते. पुणे, नाशिक, सोलापूर, रायगड-सिंधुदुर्गसारख्या ठिकाणी तीव्र चुरस अपेक्षित आहे. विदर्भ आणि मराठवाड्यात महायुतीची पारंपरिक ताकद असल्याने या जागा त्यांच्या हातच्या असतील. सध्या त्यांची लढत विरोधकांशी नसून आपापसातच आहे. भाजप सगळ्याच पक्षांपेक्षा वरचढ होण्याच्या तयारीत आहे, तर शिंदे आपला आब राखण्याच्या धडपडीत. सुनेत्रा वहिनी अद्याप चाचपडतायत. त्यांना सूर मिळण्यासाठी पटेल, तटकरे आणि पार्थ, जय यांच्यातली पक्ष ताब्यात घेण्याची स्पर्धा कमी व्हायला हवी. यंदाची रंगत कशी असेल? विधान परिषदेतील या स्थानिक स्वराज्य संस्थांमधून निवडून येणाऱ्या जागा चार-पाच वर्ष रिक्त राहिल्या. त्यामुळे विकास प्रक्रिया मंदावली. पूर्वीच्या आमदारांनी शेतकरी संकट, पाणी वाटप, सहकार क्षेत्र, शहरी विकास, शिक्षण आणि आरोग्य या मुद्द्यांवर आवाज उठवला. विधान परिषदेत उपस्थिती आणि प्रश्न विचारण्याची संख्या मर्यादित उपलब्ध असते, पण क्षेत्रीय कामे महत्त्वाची ठरतात. नवीन आमदारांनी पक्षीय राजकारणापलीकडे जाऊन स्थानिक प्रश्न सोडवावेत अशी जनतेची अपेक्षा असते. दीर्घकाळ या जागा रिक्त राहिल्याने पाणी, रस्ते, सिंचन, शेतकऱ्यांच्या कर्जमाफी, पीकविमा यांसारख्या समस्या प्रलंबित राहिल्या. मात्र आता या मार्गाने आमदारकीचा आणि विकासाचा मार्ग खुला झाला आहे. ही निवडणूक तशीही महायुतीसाठी सोप्पी आहे. कारण महायुतीचे स्थानिक संस्थांमधील बहुमत. यामुळे १२ ते १४ जागा सहज मिळू शकतात. दुसरे, मविआची एकजूट आणि क्रॉस व्होटिंग टाळण्याची रणनीती. तिसरे, मुख्य मुद्दे शेतकरी संकट, पाणी-रस्ते, सहकार घोटाळे, बेरोजगारी, शहरी-ग्रामीण असमतोल, महिला, दलित, ओबीसी आणि आदिवासी प्रतिनिधित्व. चौथे, आर्थिक प्रलोभने, आंतरिक असंतोष आणि अपक्ष उमेदवारांचा धोका. पुणे आणि ठाण्यात शहरी विकास व सहकार, विदर्भात भाजपची पारंपरिक ताकद, मराठवाड्यात राष्ट्रवादी-शिवसेना स्पर्धा, कोकणात स्थानिक नेते निर्णायक आणि पश्चिम महाराष्ट्रात शेतकरी-बहुजन राजकारण प्रभावी राहील, असा अंदाज आहे. ७५ टक्के मतदार उपस्थिती अपेक्षित राहील असे वाटतेय. लक्ष्मीदर्शन कार्यक्रम बिनदिक्कतपणे पार पडला तर मतदान १००% होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

या निवडणुकीचे राजकीय परिणाम

या १६ नवीन विधान परिषद आमदारांमुळे महायुतीला विधान परिषदेत मजबूत बहुमत मिळेल. पावसाळी अधिवेशनापूर्वी (जुलै २०२६) शपथ घेतल्यानंतर विधेयके पास करणे सोपे होईल. मविआसाठी पुनरुज्जीवनाची ही आयती संधी आहे. ही निवडणूक महाराष्ट्राच्या स्थानिक राजकारणाचे भविष्य ठरवणारी आहे. दीर्घकाळ रिक्त जागांमुळे जनतेच्या समस्या मागे राहिल्या. नवीन आमदारांनी विकास, पारदर्शकता आणि क्षेत्रीय प्रश्नांना प्राधान्य द्यावे. महायुतीचे वर्चस्व राहण्याची शक्यता जास्त असली तरी राजकारणात आश्चर्य नेहमी शक्य असते. मतदारांनी पक्षीय दबावाऐवजी विकासाचा विचार करावा.

पान १ व ४ वरुन

## जालना जिल्ह्यातील...

आले आहेत. खाजगी जागेसाठी उपविभागीय अधिकाऱ्यांची पूर्वपरवानगी आवश्यक

वरील सर्व पर्याय उपलब्ध नसल्यासच खाजगी जागेत कार्यालय सुरू करण्यास परवानगी असेल. मात्र त्यासाठी संबंधित उपविभागीय अधिकाऱ्यांची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक राहणार आहे. तसेच कार्यालयाची जागा नागरिकांच्या दृष्टीने सहज पोहोचण्याजोगी आणि दळणवळणाच्या सुविधांनी युक्त असावी, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

कार्यालयाचा पत्ता सहज सापडावा यासाठी गावातील प्रमुख ठिकाणांपासून कार्यालयापर्यंत दिशादर्शक फलक लावण्याचेही निर्देश प्रशासनाने दिले आहेत.

माहिती फलक लावणे बंधनकारक

नागरिकांना तलाठी उपलब्धतेबाबत स्पष्ट माहिती मिळावी यासाठी प्रत्येक तलाठ्याने आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व ग्रामपंचायतींच्या नोटीस बोर्डावर तसेच कार्यालयाबाहेर माहिती फलक लावणे आवश्यक राहील. या फलकावर संबंधित तलाठ्याचे नाव, भ्रमणध्वनी क्रमांक, ग्रामपंचायत कार्यालयात उपस्थित राहण्याचे दिवस आणि कामकाजाची वेळ स्पष्टपणे नमूद करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

तहसीलदारांना सर्वेक्षणाचे आदेश

जिल्ह्यातील सर्व तहसीलदारांना त्यांच्या कार्यक्षेत्रातील प्रत्येक तलाठी सजाचे सर्वेक्षण करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. सर्व कार्यालये शासकीय जागेत किंवा ग्रामपंचायत इमारतीत स्थलांतरित झाली आहेत की नाही, याची खातरजमा करण्याची जबाबदारी तहसीलदारांवर सोपविण्यात आली आहे.

नियमभंग करणाऱ्यांवर शिस्तभंग कारवाई जिल्हाधिकाऱ्यांनी या आदेशाची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे निर्देश देताना, निश्चित केलेल्या शासकीय किंवा ग्रामपंचायत जागेऐवजी इतरत्र कामकाज करणाऱ्या तलाठ्यांविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई प्रस्तावित करण्याचे स्पष्ट आदेश दिले आहेत.

तसेच सर्व महसूल अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास हे परिपत्रक आणून त्याची तात्काळ प्रभावाने अंमलबजावणी करण्याबाबत दक्षता घेण्याचे निर्देश प्रशासनाने दिले आहेत.

नागरिकांना मिळणार मोठा दिलासा जिल्हा प्रशासनाच्या या निर्णयामुळे महसूल विभागातील सेवा अधिक पारदर्शक आणि लोकाभिमुख होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. तलाठी कार्यालयांचे निश्चित ठिकाण उपलब्ध झाल्याने नागरिकांना सातबारा, फेरफार, उत्पन्न दाखले, जात प्रमाणपत्रांसाठी लागणारे महसुली अहवाल आणि इतर कामांसाठी वारंवार हेलपाटे मारण्याची गरज कमी होणार आहे. तसेच ग्रामीण भागातील नागरिकांचा वेळ आणि खर्च वाचून महसूल सेवांचा लाभ अधिक सुलभपणे मिळण्यास मदत होणार आहे.

## बकरी ईदच्या...

बैल (लाल, पांढऱ्या व काळ्या रंगाचे) अंदाजे किंमत ५ लाख २० हजार रुपये अशा प्रकारे एकूण ६ लाख ९५ हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे.

दोघांविरुद्ध गुन्हा दाखल

या प्रकरणी कदीम जालना पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक २७८/२०२६ नुसार प्राणी संरक्षण अधिनियमातील कलम ५ (अ), ५ (ब), ९ तसेच प्राण्यांचा छळ प्रतिबंध अधिनियम १९६० मधील कलम ११(१), ११(१)(), ११(१)() आणि ११(१)() अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी खालील आरोपींविरुद्ध कारवाई केली आहे : शेख जुबेर शेख फिरोज, रा. मोरंडी मोहल्ला, जुना जालना

ग्यासोद्दीन कमरोद्दीन

कुरेशी, मोरंडी मोहल्ला, जुना जालना वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई

ही धडक कारवाई जालना जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधू, अप्पर पोलीस अधीक्षक विक्रम साळी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

कारवाईत पोलीस निरीक्षक जनार्धन शेवाळे, सहाय्यक पोलीस निरीक्षक अविनाश गडाख, अमित मस्के तसेच कदीम जालना पोलीस ठाण्यातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला. या गुन्ह्याचा पुढील तपास मपोहेकॉ प्रतिभा पंडुरे करीत आहेत.

बेकायदेशीर कत्तलीविरोधात पोलिसांचा इशारा

बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात गोवंशीय जनावरांची अवैध वाहतूक, साठवणूक अथवा विनापरवाना कत्तल करणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई सुरू असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे. कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर गुन्हे दाखल करण्यात येतील, असा इशाराही पोलिस प्रशासनाने दिला आहे.

या कारवाईमुळे अवैध कत्तल प्रकरणांना आळा बसण्यास मदत होणार असून, जनावरांची वेळेत सुटका करण्यात पोलिसांना यश आल्याने प्राणीसंवर्धन क्षेत्रातील कार्यकर्त्यांनी समाधान व्यक्त केले आहे.

## जालना जिल्हा...

भरघोस विकास निधी दिला. मराठवाड्यातून महायुतीचे ४० आमदार निवडून आले होते. शिवसेनेचे मंत्री, खासदार आणि आमदार मराठवाड्यात आहेत. आमदार अर्जुन खोतकर यांच्या नेतृत्वात जालना महापालिकेच्या पहिल्याच निवडणुकीत शिवसेनेला चांगली कामगिरी करता आली. आता जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांवर भगवा फाकवण्यासाठी सर्वांनी आतापासूनच कामाला लागा असे खासदार डॉ. शिंदे म्हणाले. कार्यकर्ता काय काम करत असतो याची नोंद पक्ष नेतृत्व घेत असते असे ते म्हणाले. मतदार याद्या पुनरीक्षणासाठी पक्षाने जे बीएलए नियुक्त केले आहेत त्यांनी एसआयआर सुरू होताच बीएलओ सोबत घरोघरी जावे. आपल्या मतदाराचे नाव यादीत आहे की नाही याची खात्री करावी अशा सूचना खासदार डॉ. शिंदे यांनी यावेळी दिल्या. जालना जिल्हा परिषदेचे ५७ गट असून ८ पंचायत समित्यांचे ११४ गण आहेत. ओबीसी आरक्षण मर्यादा ओलांडल्याने जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणूक लांबणीवर पडली आहे. तत्पूर्वी खासदार डॉ. शिंदे यांची जालना शहरातील उद्योजक आणि डॉक्टर यांच्यासमवेत बैठक झाली.

घनसावंगी येथे झालेल्या दुसऱ्या आढावा बैठकीत खासदार डॉ. शिंदे यांनी तालुका प्रमुख आणि कार्यकर्त्यांची मते जाणून घेतली. यावेळी शिवसेना आमदार हिकमत उढाण व मंत्री संजय शिरसाट, माजी खासदार आनंद परांजपे, जयदीप बोराडे उपस्थित होते. परतूर आणि घनसावंगी मतदार संघात सर्व बीएलएची नियुक्ती झाली आहे.

लवकरच त्यांचे मार्गदर्शन शिबीर आयोजित केले जाईल, असे आमदार उढाण म्हणाले. जिल्हा परिषदेवर परतूर आणि घनसावंगी मधून जास्तीत जास्त जागा निवडून येण्यासाठी शिवसैनिकांनी मजबुतीने प्रयत्न करावेत, असे मत खासदार डॉ. शिंदे यांनी यावेळी व्यक्त केले. शिवसंवाद दौऱ्यातून पक्षाचे खासदार, आमदार , मंत्री काम करतात की नाही याचा आढावा थेट कार्यकर्त्यांकडून घेतला जातो. हा अहवाल थेट शिंदे साहेबांना सादर केला जात असल्याने कार्यकर्त्यांना न्याय मिळतो असे खासदार डॉ. शिंदे म्हणाले.

**खासदार डॉ. शिंदे तीन दिवस मराठवाड्याच्या दौऱ्यावर**

खासदार डॉ. श्रीकांत शिंदे शिवसंवादच्या निमित्ताने तीन दिवस मराठवाड्याच्या दौऱ्यावर असून ते जालना, नांदेड ,हिंगोली आणि बीड या जिल्ह्यातील विधानसभानिहाय मतदार संघांचा आढावा घेणार आहेत.

## तेल कंपन्यांचे...

यांसारखे मोठे ग्राहक ( ) अचानक सरकारी पंपांवर वळले आहेत. सरकारी पंपांवर अचानक ८० टक्क्यांपर्यंत मागणी वाढल्याने तिथला साठा वेगाने संपत आहे.

पॅनिक बायिंग आणि अफवा: सोशल मीडियावर इंधनाचा मोठा तुटवडा होणार असल्याच्या अफवा पसरल्याने नागरिकांनी गरजेपेक्षा जास्त डिझेल साठवून ठेवण्यास ( ) सुरुवात केली. महाराष्ट्रात काही जिल्ह्यांमध्ये एकाच दिवसात डिझेलच्या मागणीत ५२% पेक्षा जास्त वाढ नोंदवली गेली, ज्यामुळे उपलब्ध साठा अपुरा पडू लागला.

खरीप हंगामाची पूर्वतयारी: मे महिन्याचा शेवटचा आठवडा असल्याने शेतकरी मान्सूनपूर्व मशागतीच्या कामात व्यस्त आहेत. ट्रॅक्टर आणि इतर शेती यंत्रांसाठी ग्रामीण भागात डिझेलची मागणी एकाच वेळी वाढली आहे.

मंत्रालयाचे स्पष्टीकरण आणि सद्यस्थिती

केंद्रीय पेट्रोलियम मंत्रालय आणि राष्ट्रीय तेल कंपन्यांनी स्पष्ट केले आहे की, देशात डिझेलचा एकूण साठा () पुरेसा आहे. अडचण केवळ पुरवठा साखळीत ( ) झाल

ी आहे. आधी खाजगी आणि सरकारी पंप मिळून बाजाराची गरज भागवत होते, मात्र आता खाजगी पंप बंद पडल्यासारखेच असल्याने सर्व भार सरकारी पुरवठा यंत्रणेवर आला आहे. डेपोमधून पंपांपर्यंत टँकर पोहोचण्यास लागणारा वेळ आणि बँकिंग व्यवहारांमधील मर्यादांमुळे हा स्थानिक पातळीवर तुटवडा जाणवत असून, पुढील काही दिवसांत अतिरिक्त पुरवठा करून परिस्थिती पूर्वपदावर आणली जाईल, असे आश्वासन प्रशासनाकडून देण्यात आले आहे.

## MIDC परिसरात..

देशमुख आणि इतर कर्मचाऱ्यांनी ही धडक कारवाई यशस्वी केली.


अवैध शस्त्रधारकांवर पोलिसांची करडी नजर

शहरात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी अवैध शस्त्र बाळगणाऱ्यांविरुद्ध विशेष मोहीम राबविण्यात येत असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे. विशेषतः औद्योगिक व व्यापारी भागांमध्ये दहशत निर्माण करणाऱ्या समाजकंटकांवर कठोर कारवाई केली जाणार असल्याचा इशाराही पोलिसांनी दिला आहे.

एमआयडीसीसारख्या महत्त्वाच्या औद्योगिक परिसरात वेळेत केलेल्या या कारवाईमुळे संभाव्य अनुचित घटना टळल्याचे बोलले जात असून, पोलिसांच्या तत्परतेचे नागरिकांकडून स्वागत करण्यात येत आहे.

# ‘बकरी ईद’ निमित्त सोसायट्यांमध्ये होणारी पशूंची अवैध हत्या प्रशासनाने रोखावी !

## - रमेश शिंदे, राष्ट्रीय प्रवक्ते, हिंदु जनजागृती समिती



मुंबई - सोसायटींमध्ये पशूंची हत्या न करण्याचा सर्वोच्च न्यायालयाचा आदेश आहे. असे असूनही मीरा-भाईंदरसारख्या मुसलमानबहुल भागांतील सोसायट्यांमध्ये बकरी ईदनिमित्त हत्या करण्यासाठी पशूंना आणले जात आहे. बकरी ईदनिमित्त सोसायट्यांमध्ये अशा प्रकारे होणारी पशूंची अवैध हत्या प्रशासनाने रोखावी, असे आवाहन हिंदु जनजागृती समितीचे राष्ट्रीय प्रवक्ते श्री. रमेश शिंदे यांनी केले आहे. याविषयी श्री. रमेश शिंदे यांनी मंत्रालयात वृत्तवाहिन्यांच्या प्रतिनिधींना मुलाखत दिली.

यावेळी श्री. रमेश शिंदे म्हणाले, ‘‘बकरी ईदनिमित्त सोसायट्यांमध्ये बकऱ्या आणून त्यांना कापले जाते. या वेळी रक्तमिश्रित पाणी आजूबाजूच्या परिसरात फेकले जाते. त्यामुळे रोगराई पसरते. याचा प्रशासनाने गांभीर्याने विचार करावा.’’

हिंदूंच्या सणांच्या वेळी प्रदूषणाची आवई उठवणारे आता कुठे आहेत ?

होळी, गणेशोत्सव आदी हिंदूंच्या सणांच्या वेळी हिंदी चित्रपट सृष्टीतील कलाकार, तसेच पुरोगामी मंडळी प्रदूषण होत असल्याची आवई उठवून ते रोखण्याचे आवाहन करण्यासाठी पुढे येतात.

बकरी ईदनिमित्त पशूंच्या अवैध हत्या करून रक्तमिश्रित पाण्यामुळे होत असलेल्या रोगाच्या प्रादूर्भावाविषयी ही मंडळी का पुढे येत नाहीत ? असा प्रश्न या वेळी श्री. रमेश शिंदे यांनी या वेळी उपस्थित केला.

**श्री. रमेश शिंदे,**
**राष्ट्रीय प्रवक्ता, हिंदु जनजागृती समिती.**
**(संपर्क क्र.: ९९८७९ ६६६६६)**

## अपर मुख्य सचिव (महसूल) विकास खारगे यांचा जालना जिल्हा दौरा

**जालना -प्रतिनिधी**

राज्याचे अपर मुख्य सचिव (महसूल) विकास खारगे हे दि. २९ मे २०२६ रोजी जालना जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत असून त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे

शुक्रवार दि. २९ मे,२०२६ रोजी सकाळी ८.०० वाजता ड्रायपोर्ट प्रकल्प दरेगाव, ता. जालना येथे भेट देवून पाहणी करणार आहेत. सकाळी ९.०० वाजता मोतीबाग चौपाटी येथे आगमन व सुशोभिकरण कामाला भेट व पाहणी करणार आहेत. सकाळी ९.१५ वाजता जिल्हा रेशीम कोष बाजारपेठ, सिरसवाडी रोड, जालना येथे आगमन भेट व पाहणी करणार आहेत. सकाळी १०.०० ते ११.०० वाजता शासकीय विश्रामगृह, जालना येथे राखीव. सकाळी ११.०० ते दुपारी १२.३० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, जालना येथे आढावा बैठक व पाहणी. दुपारी १२.३० वाजता उपअधीक्षक भुमी अभिलेख कार्यालय, प्रशासकीय इमारत दुसरा मजला, जालना येथे भेट व पाहणी. दुपारी १.१५ वाजता उपविभागीय अधिकारी कार्यालय, जालना येथे भेट व पाहणी. दुपारी २.०० वाजता कृषी पर्यटन केंद्र लालवाडी, ता. अंबड येथे आगमन व भोजन. दुपारी ३.०० वाजता तहसिल कार्यालय, अंबड व आधार केंद्र, तहसिल कार्यालय परिसर तसेच महा -ई -सेवा केंद्र अंबड येथे भेट व पाहणी. दुपारी ३.४५ वाजता सह दुय्यम निबंधक कार्यालय, अंबड येथे भेट व पाहणी.

# ऑनलाइन अभ्यासाच्या जोरावर दीपक नांदोडेची आयआयटी कानपूरमध्ये झेप

## आयआयटी जॅम २०२६ परीक्षेत देशात १६८ वा क्रमांक

**मंठा - प्रतिनिधी**

जिद्द, सातत्य आणि योग्य मार्गदर्शनाच्या बळावर विद्यार्थ्यांनी यशाची नवी शिखरे गाठल्याची अनेक उदाहरणे आहेत. त्यातच अहिल्यानगर येथे विज्ञान शाखेतील सांख्यिकी विषयाच्या तृतीय वर्षाचे शिक्षण घेणाऱ्या दीपक मनोज नांदोडे याने ऑनलाइन अभ्यासाच्या जोरावर उल्लेखनीय यश संपादन करत भारतीय तंत्रज्ञान संस्था कानपूर येथे अर्थशास्त्र विषयातील पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी प्रवेश निश्चित केला आहे.

दीपक नांदोडे याने तृतीय वर्षात असतानाच आयआयटी जॅम २०२६ परीक्षेची तयारी सुरू केली होती. तयारीसाठी त्याने ‘मॅथस्टॅट्स क्लास’ या ऑनलाइन मार्गदर्शन संस्थेत प्रवेश घेतला. संस्थेकडून मिळालेले योग्य मार्गदर्शन, अभ्यासाचे नियोजन आणि मित्रांकडून मिळालेली प्रेरणा यामुळे त्याची तयारी अधिक सक्षम झाली.सुमारे सात ते आठ महिने सातत्यपूर्ण व मनापासून अभ्यास करून दीपकने आयआयटी जॅम २०२६ परीक्षेला सामोरे गेले. दिनांक १५ फेब्रुवारी २०२६ रोजी झालेल्या या परीक्षेचा निकाल १९ मार्च २०२६ रोजी जाहीर झाला. या परीक्षेत त्याने अखिल भारतीय क्रमांक १६८ मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले.



यानंतर दिनांक २५ मे २०२६ रोजी जाहीर झालेल्या पहिल्या प्रवेश यादीत दीपकची भारतीय तंत्रज्ञान संस्था कानपूर येथे अर्थशास्त्र विषयातील पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी निवड झाली. विशेष म्हणजे कोणत्याही प्रत्यक्ष वर्गांना उपस्थित न राहता केवळ ऑनलाइन माध्यमातून अभ्यास करून त्याने हे यश मिळवले आहे. दीपक हा ‘दैनिक सकाळ’चे मंठा तालुका प्रतिनिधी कृष्णा भावसार यांचा नातू असून त्याच्या या यशाबद्दल सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

या यशाबद्दल बोलताना दीपकने आपल्या शिक्षकांचे, आई अनिता नांदोडे, वडील मनोज नांदोडे, मार्गदर्शक, ऑनलाइन मार्गदर्शन संस्था तसेच सहकाऱ्यांचे मनःपूर्वक आभार मानले. ‘‘योग्य नियोजन, सातत्यपूर्ण अभ्यास आणि आत्मविश्वास यांच्या बळावर कोणतेही ध्येय गाठता येते,’’ अशी भावना त्याने व्यक्त केली.

‘‘यश मिळवण्यासाठी महागडे क्लासेस किंवा मोठ्या शहरांची गरज नसते, तर गरज असते ती जिद्द, सातत्यपूर्ण अभ्यास आणि स्वतःवर असलेल्या विश्वासाची. मी केवळ ऑनलाइन माध्यमातून अभ्यास करत आयआयटी जॅम २०२६ परीक्षेत अखिल भारतीय १६८ वा क्रमांक मिळवला. अनेक विद्यार्थी लाखो रुपये खर्च करूनही अपेक्षित यश मिळवू शकत नाहीत; मात्र योग्य नियोजन, वेळेचे व्यवस्थापन आणि प्रामाणिक परिश्रम यांच्या जोरावर कोणतेही ध्येय। गाठता येते, हे मी सिद्ध करून दाखवले.माझ्या या प्रवासात आई-वडील, शिक्षक, मार्गदर्शक, ऑनलाइन मार्गदर्शन संस्था आणि मित्रांनी दिलेली साथ हीच माझी खरी ताकद ठरली.‘‘

**दीपक मनोज नांदोडे**

# राष्ट्रीय कर्तव्यावर असताना शिक्षकांचा मृत्यू; कुटुंबीयांना ५० लाखांचे अनुदान व नोकरी द्या!

### महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन हक्क संघटन आणि हॅप्पी टू हेल्प फाउंडेशनची मुख्यमंत्र्यांकडे आक्रमक मागणी; सिल्लोड येथे उपविभागीय अधिकारी यांना निवेदन

**सिल्लोड विशेष प्रतिनिधी**

देशाच्या आणि राज्याच्या अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या जनगणनेच्या राष्ट्रीय कामासाठी तैनात असलेल्या शिक्षकांवर सध्या कामाचा प्रचंड ताण आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत आणि मानसिक-शारीरिक ताण सहन करत शिक्षक हे कर्तव्य बजावत असतानाच, राज्यातील चार कर्तव्यनिष्ठ शिक्षकांचा अकाली मृत्यू झाल्याची धक्कादायक आणि क्लेशदायक घटना घडली आहे. या घटनेमुळे संपूर्ण शिक्षक वर्गात तीव्र संताप आणि शोककळा पसरली आहे.

या पार्श्वभूमीवर, मृत शिक्षकांच्या कुटुंबीयांना ५० लाख रुपयांचे सानुग्रह अनुदान आणि अनुकंपा तत्त्वावर तात्काळ शासकीय नोकरी देण्यात यावी, अशी आक्रमक मागणी महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन हक्क संघटन आणि हॅप्पी टू हेल्प फाउंडेशन यांच्या वतीने करण्यात आली आहे.

या मागणीचे निवेदन मुख्यमंत्री आणि जनगणना संचालनालय प्रमुखांच्या नावे सिल्लोडचे उपविभागीय अधिकारी () यांच्यामार्फत सादर करण्यात आले.



**कर्तव्य बजावताना या चार शिक्षकांनी गमावले प्राणः**

शासकीय कर्तव्य बजावत असताना मृत्यूमुखी पडलेल्या शिक्षकांची नावे खालीलप्रमाणे आहेतः

१. श्री. भगवान पाटील (कोल्हापूर) कर्तव्य बजावताना हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन.

२. श्री. राजाराम ढोले (सांगोला) कर्तव्य बजावताना हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन.

३. श्री. सुंदरम वांगसकर (लातूर) जनगणना कर्तव्यावर असताना भीषण अपघातात दुर्दैवी मृत्यू.

४. श्रीमती दीपाली लोंढे (मंचर, ता. खेड) जनगणना कर्तव्यावर असताना भीषण अपघातात दुर्दैवी मृत्यू.

**‘‘शिक्षकांवर हल्ले आणि कुत्र्यांचे चावे; तरीही जीव मुठीत धरून काम!‘‘**

निवेदनात नमूद केल्यानुसार, सध्या जनगणना करणाऱ्या प्रगणक शिक्षकांना अनेक ठिकाणी हिंसेला सामोरे जावे लागत आहे. अनेक शिक्षकांवर हल्ले झाले असून काहींना कुत्र्यांनी चावा घेतल्याच्या घटना घडल्या आहेत. अशा असुरक्षित वातावरणात शिक्षक काम करत आहेत.

**संघटनांच्या प्रमुख आणि रोकठोक मागण्याः**

५० लाखांची आर्थिक मदतः जनगणना कर्तव्य बजावताना मृत्यू पावलेल्या प्रगणक/शिक्षकाच्या कुटुंबीयांना तात्काळ रु. ५० लाख सानुग्रह आर्थिक अनुदान मंजूर करण्यात यावे.

विलंब न लावता शासकीय नोकरीः मृत शिक्षकांच्या वारसांना (कुटुंबीयांना) कोणताही तांत्रिक विलंब न लावता प्राधान्याने अनुकंपा धोरणांतर्गत शासकीय सेवेत सामावून घेण्यात यावे.

विमा व आरोग्य संरक्षणः जनगणनेसारख्या व्यापक कामात कार्यरत असणाऱ्या सर्व प्रगणक आणि पर्यवेक्षकांना कामाच्या कालावधीसाठी स्वतंत्र आरोग्य व अपघात विमा संरक्षण लागू करण्यात यावे.

**‘‘शासनाने कर्मचाऱ्यांना वाऱ्यावर सोडू नये!‘‘**

या प्रसंगी प्रसारमाध्यमांशी बोलताना महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन हक्क संघटनचे राज्य प्रवक्ता आणि हॅप्पी टू हेल्प फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष शेख अब्दुल रहीम यांनी शासनाला इशारा दिला. ते म्हणाले, ‘‘शिक्षक हा राष्ट्रनिर्माणाचा आणि शासकीय योजनांचा मुख्य कणा आहे. राष्ट्रीय कर्तव्य बजावताना प्राणाची आहुती देणाऱ्या या शिक्षकांच्या कुटुंबीयांचे कमावते छत्र हरपले असून, त्यांचे वृद्ध आई-वडील, पत्नी आणि लहान मुले पूर्णपणे उघड्यावर आली आहेत.

त्यांच्या कुटुंबीयांना आधार देणे ही शासनाची नैतिक आणि कायदेशीर जबाबदारी आहे. शासनाने आपल्याच कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांना वाऱ्यावर सोडले, तर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल.‘‘ या संवेदनशील विषयाची माननीय मुख्यमंत्री आणि संचालक यांनी तात्काळ दखल घेऊन मृत शिक्षकांच्या कुटुंबांना न्याय द्यावा, अशी तीव्र मागणी आता जोर धरत आहे.....

# मान्सून पूर्वतयारीसाठी जिल्हा प्रशासन सज्ज

## मोती तलाव येथे आपत्कालीन शोध व बचाव साहित्याची रंगीत तालीम संपन्न

**जालना-प्रतिनिधी**

आगामी मान्सून कालावधीच्या पार्श्वभूमीवर संभाव्य आपत्कालीन परिस्थितीला तात्काळ व प्रभावी प्रतिसाद देता यावा, तसेच आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा अधिक सक्षम व सज्ज राहावी यासाठी जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण आशिमा मित्तल यांच्या निर्देशानुसार व जालना शहर महानगरपालिका आयुक्त अंजली शर्मा, निवासी उपजिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण शशिकांत हदगल यांच्या मार्गदर्शनाखाली जालना शहरातील मोती तलाव येथील विसर्जन कुंड परिसरात जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभाग व अग्निशमन विभाग, जालना यांच्या संयुक्त विद्यमाने आपत्कालीन शोध व बचाव साहित्याची भव्य रंगीत तालीम आयोजित करण्यात आली होती. यावेळी जिल्हाधिकारीआशिमा मित्तल, मनपा आयुक्त अंजली शर्मा, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी दिपक काजळकर तसेच अग्निशमन अधिकारी संदीप दराडे यांची प्रमुख उपस्थिती होती. याशिवाय अग्निशमन विभाग, जालना, बदनापूर व अंबड येथील अधिकारी व कर्मचारी, तसेच रायगड येथे प्रशिक्षण पूर्ण करून आलेले ‘आपदा मित्र’ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. रंगीत तालीमेदरम्यान पूर, अतिवृष्टी, पाण्यात अडकलेल्या नागरिकांचा बचाव, आपत्कालीन स्थलांतरण तसेच नैसर्गिक आपत्तीच्या प्रसंगी वापरण्यात येणाऱ्या अत्याधुनिक शोध व बचाव साहित्यांचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. यामध्ये फायबर बोट, इन्फ्लाटेबल रबर बोट, स्कुबा सेट, फायर जेल ब्लँकेट, लाईफबोये, बॅटरी कटर, बॅटरी स्प्रेडर, फ्लोटींग पंप, पोर्टेबल जनरेटर, पोर्टेबल पंप, मेगाफोन, सेफ्टी नेट, लाईफ जॅकेट व रिफ्लेक्टर जॅकेट आदी साहित्यांच्या कार्यपद्धती व वापराबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. तसेच पाण्यात बुडणाऱ्या व्यक्तीचा सुरक्षितरित्या बचाव कसा करावा, पूरस्थितीत रबर बोटीद्वारे नागरिकांचे स्थलांतरण कशा पद्धतीने करावे, आपत्कालीन परिस्थितीत समन्वय साधून तात्काळ प्रतिसाद कसा द्यावा याबाबत अग्निशमन विभागामार्फत प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांसह प्रशिक्षण देण्यात आले. मान्सून कालावधीत उद्भवणाऱ्या संभाव्य नैसर्गिक आपत्तींचा प्रभाव कमी करण्यासाठी तसेच नागरिकांच्या जीवित व मालमत्तेचे संरक्षण करण्यासाठी जिल्हा प्रशासनामार्फत सर्व यंत्रणा सज्ज ठेवण्यात येत असून, अशा प्रकारच्या रंगीत तालीम व प्रशिक्षण उपक्रमांमुळे आपत्ती प्रतिसाद यंत्रणांमध्ये समन्वय, तत्परता व कार्यक्षमता अधिक बळकट होत असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.

# जालना बसस्थानकासमोरील लॉजवर पोलिसांचा छापा; देहविक्री व्यवसाय प्रकरणी पाच जणांवर गुन्हा

**जालना - प्रतिनिधी**

शहरातील बसस्थानकासमोरील एका लॉजमध्ये सुरू असलेल्या कथित देहविक्री व्यवसायावर सदर बाजार पोलिसांनी धडक कारवाई करत पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या कारवाईदरम्यान रोख रक्कम, मोबाईल फोन तसेच कंडोमची पाकिटे जप्त करण्यात आली असून, महिलांचा अनैतिक व्यापार प्रतिबंध अधिनियमांतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जालना जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधू आणि अप्पर पोलीस अधीक्षक यांच्या निर्देशानुसार जिल्ह्यातील देहविक्री व्यवसाय सुरू असलेल्या ठिकाणांवर विशेष लक्ष ठेवण्यात येत आहे. त्यानुसार सदर बाजार पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक भारती सोळंके यांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे ही कारवाई करण्यात आली.

**बसस्थानकासमोरील लॉजमध्ये सुरू होता व्यवसाय**

मिळालेल्या माहितीनुसार, शहरातील मध्यवर्ती बसस्थानकासमोरील न्यू वैष्णवी लॉज या इमारतीच्या पहिल्या मजल्यावर बाहेरून महिलांना बोलावून त्यांच्या माध्यमातून देहविक्रीचा व्यवसाय चालविला जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीची खातरजमा केल्यानंतर पोलिसांनी नियोजनबद्ध सापळा रचला. दिनांक २६ मे २०२६ रोजी सायंकाळी सुमारे ५ वाजण्याच्या सुमारास पोलिसांनी संबंधित लॉजवर छापा टाकला. कारवाईदरम्यान तेथे अनैतिक व्यवसाय सुरू असल्याचे निदर्शनास आले. यावेळी घटनास्थळावरून रोख रक्कम, मोबाईल फोन आणि कंडोमची पाकिटे असा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

**पाच जणांविरुद्ध गुन्हा**

या प्रकरणी सदर बाजार पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ४६४/२०२६ नुसार महिलांचा अनैतिक व्यापार (प्रतिबंध) अधिनियम, १९५६ मधील कलम ३, ४, ५ आणि ६ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**पोलिसांनी खालील आरोपींविरुद्ध कारवाई केली आहे :**

कैलास रतनलाल कुम्हार (वय ३०) व्यवसाय मॅनेजर, मूळ रा. चित्तौडगड (राजस्थान), सध्या न्यू वैष्णवी लॉज, जालना. करण रवि वाहुळे (वय २०) व्यवसाय मजुरी, रा. जामवाडी, ता. जि. जालना. नारायण रामेश्वर सेन (वय ३७) व्यवसाय मजुरी, रा. उडवागाव, चित्तौडगड (राजस्थान). स्वप्नील मधुकर खेडकर (वय २६) व्यवसाय शेती, रा. रुमणा चांगेफळ, ता. सिंदखेडराजा, जि. बुलढाणा. ऋषिकेश रामकिसन जायभाये (वय २३) व्यवसाय मेकॅनिक, रा. रुमणा चांगेफळ, ता. सिंदखेडराजा, जि. बुलढाणा.

वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वी कारवाई ही कारवाई जालना जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक , अप्पर पोलीस अधीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

कारवाईत पोलीस निरीक्षक भारती सोळंके, सहाय्यक पोलीस निरीक्षक आनंदसिंग साबळे, अविनाश गडाख तसेच पोलीस कर्मचारी कोकणे, बाबा हरणे, रामप्रसाद रंगे, विनोद निकम, संतोष जाधव, कारभारी जारवाल, शिवकन्या मगर आणि नसीम पठाण यांनी सहभाग घेतला.

**पुढील तपास सुरू**

या प्रकरणाचा पुढील तपास पोहेकॉ संतोष जाधव करीत असून, या अनैतिक व्यवसायामागे आणखी कोणाचे जाळे कार्यरत आहे का, याचाही शोध पोलीस घेत आहेत. शहरात महिलांच्या अनैतिक व्यापाराला आळा घालण्यासाठी अशा प्रकारच्या कारवाया यापुढेही सुरू राहणार असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले.

या कारवाईमुळे शहरात सुरू असलेल्या बेकायदेशीर देहविक्री व्यवसायाविरोधात पोलिसांनी कठोर भूमिका घेतल्याचे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे.

# व्हर्च्युअल सुनावणी सक्तीची नाही, पण काळाची गरज

पश्चिम आशियातील संघर्षामुळे निर्माण झालेल्या इंधन संकट काळात न्यायालयीन कामकाजासाठी व्हर्च्युअल अर्थात ऑनलाइन सुनावणी बंधनकारक करता येणार नाही, असे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे. तथापि, न्यायालयाने वकील वर्गाला स्वेच्छेने व्हर्च्युअल सुनावणीचा पर्याय निवडण्याचे आवाहन केले आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या या भूमिकेचे जालना येथील नोटरी असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. महेश धन्नावत यांनी स्वागत केले असून, व्हर्च्युअल सुनावणी ही काळाची गरज असल्याचे मत व्यक्त केले आहे.

सरन्यायाधीश सूर्यकांत, न्यायमूर्ती जयमाल्य बागची आणि न्यायमूर्ती विपुल एम. पंचोली यांच्या खंडपीठासमोर इंधन संकटाच्या पार्श्वभूमीवर तीन महिन्यांसाठी किरकोळ प्रकरणे व्हर्च्युअल पद्धतीने चालवण्याचे निर्देश देण्याची मागणी करणाऱ्या याचिकेवर सुनावणी झाली. याचिकाकर्त्याच्या पुढाकाराचे कौतुक करताना न्यायालयाने म्हटले की, वकील वर्गाला येणाऱ्या व्यावहारिक अडचणी जाणून घेतल्याशिवाय त्यांना केवळ ऑनलाइन हजर राहण्याचे न्यायिक आदेश देणे विवेकपूर्ण ठरणार नाही. त्यामुळे, न्यायालय यासंदर्भात कोणताही थेट आदेश जारी करत नाही, परंतु प्रशासकीय पातळीवरून व्हर्च्युअल सुनावणीसाठी आम्ही कळकळीचे आवाहन करत आहोत, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

यावर प्रतिक्रिया देताना, जालना नोटरी असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. महेश धन्नावत म्हणाले, ‘‘सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय अत्यंत संतुलित आणि व्यावहारिक आहे. अनेक वकिलांना, विशेषतः ग्रामीण भागातील, तांत्रिक अडचणींचा सामना करावा लागतो. त्यामुळे व्हर्च्युअल सुनावणीची सक्ती करणे योग्य ठरले नसते. तथापि, इंधन बचत आणि वेळेची बचत या दृष्टीने व्हर्च्युअल सुनावणी हे एक अत्यंत प्रभावी माध्यम आहे. कोरोना काळात आपण या प्रणालीचे फायदे अनुभवले आहेत. त्यामुळे, शक्य असेल तिथे वकिलांनी आणि पक्षकारांनी या पर्यायाचा स्वीकार करायला हवा. यामुळे न्यायदान प्रक्रियेला गती मिळण्यासही मदत होईल.‘‘

याचिकाकर्त्याने असा युक्तिवाद केला की, वकिलांच्या प्रवासाव्यतिरिक्त, कैद्यांना न्यायालयात हजर करण्यासाठी मोठ्या प्रमाणात इंधनाचा वापर होतो.

दररोज २५० हून अधिक बस कैद्यांची ने-आण करतात. यावर सरन्यायाधीशांनी सांगितले की, पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयात कैद्यांना व्हर्च्युअल पद्धतीने हजर करण्याची परवानगी आहे. जर एखादे विशिष्ट उच्च न्यायालय या प्रथेचे पालन करत नसेल, तर संबंधित तथ्ये गोळा करून सर्वोच्च न्यायालय प्रशासकीय पातळीवर या प्रकरणाची तपासणी करू शकते, असेही त्यांनी नमूद केले.

सरन्यायाधीशांनी पुढे सांगितले की, ‘‘मी यापूर्वीच उच्च न्यायालयांच्या मुख्य न्यायाधीशांना पत्र लिहून व्हर्च्युअल सुनावणीचा फायदा घेण्याचे आवाहन केले आहे.‘‘

न्यायालयाच्या या भूमिकेमुळे, व्हर्च्युअल सुनावणीसाठी आवश्यक लॉजिस्टिक सहाय्य देण्यास न्यायालय तयार असले तरी, ते सक्तीचे करता येणार नाही हे स्पष्ट झाले आहे. बार कौन्सिलचे अध्यक्ष आणि सर्वोच्च न्यायालयाच्या बार असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी आपल्या सदस्यांना या पर्यायासाठी प्रोत्साहित करावे, असेही न्यायालयाने सुचवले. हे लक्षात घेण्यासारखे आहे की, केंद्र सरकारच्या इंधन संवर्धन उपायांच्या अनुषंगाने, सर्वोच्च न्यायालयाने यापूर्वी काही विशिष्ट श्रेणीतील प्रकरणांसाठी, विशेषतः सोमवार आणि शुक्रवारी, व्हर्च्युअल सुनावणी अनिवार्य करणारे प्रशासकीय उपाय लागू केले होते.

तथापि, वकील वर्गाच्या निवेदनानंतर, न्यायालयाने स्पष्ट केले की, वकिलांना व्हर्च्युअल हजर राहण्यासाठी प्रोत्साहित केले जात असले तरी, ज्यांना अपरिहार्य कारणांमुळे प्रत्यक्ष हजर राहणे आवश्यक आहे, त्यांना तसे करण्याची मुभा असेल. अखेरीस, न्यायालयाने ही रिट याचिका निकाली काढली. या प्रकरणाची नोंद शोभा गुप्ता विरुद्ध भारतीय संघराज्य अशी आहे. एकूणच, न्यायालयाच्या या निर्णयामुळे व्हर्च्युअल आणि प्रत्यक्ष सुनावणी यांच्यात संतुलन साधण्याचा प्रयत्न दिसून येतो, ज्याचे कायदे वर्तुळातून स्वागत होत आहे.

# MIDC परिसरात दहशत माजविणाऱ्या दोन युवकांना चंदनझिरा पोलिसांनी ठोकल्या बेड्या; दोन धारदार खंजिर जप्त

**जालना -प्रतिनिधी**
शहरातील औद्योगिक वर्दळीच्या एमआयडीसी परिसरात अवैधरित्या धारदार शस्त्रे बाळगून दहशत निर्माण करणाऱ्या दोन युवकांना चंदनझिरा पोलिसांनी अटक केली आहे. या कारवाईत आरोपींकडून दोन धारदार खंजिर जप्त करण्यात आले असून, दोघांविरुद्ध भारतीय हत्यार कायद्यान्वये स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.
पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २७ मे २०२६ रोजी दुपारी सुमारे १ वाजण्याच्या सुमारास एमआयडीसी परिसरात दोन युवक धारदार शस्त्रे घेऊन संशयास्पद हालचाली करत असल्याची गोपनीय माहिती चंदनझिरा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक बाळासाहेब पवार यांना प्राप्त झाली होती. संबंधित युवक परिसरात दहशतीचे वातावरण निर्माण करत असल्याचीही माहिती पोलिसांना मिळाली.
माहिती मिळताच पोलिसांचे तात्काळ पथक रवाना
माहितीची गंभीर दखल घेत पोलीस निरीक्षक बाळासाहेब पवार यांनी तातडीने विशेष पथकाला कारवाईचे आदेश दिले. त्यानुसार पोलिसांचे पथक एमआयडीसी रोडवरील स्वराज पार्किंगसमोर दाखल झाले. तेथे संशयित युवकांची हालचाल पाहून पोलिसांनी



त्यांना ताब्यात घेतले.
झडतीदरम्यान दोघांकडून प्रत्येकी एक असे दोन धारदार खंजिर आढळून आले. या शस्त्रांबाबत कोणताही वैध परवाना किंवा अधिकृत कागदपत्रे सादर करता न आल्याने पोलिसांनी दोघांना अटक करून पोलीस ठाण्यात आणले.आरोपींची ओळख पटली अटकेत घेण्यात आलेल्या आरोपींची नावे पुढीलप्रमाणे आहेत :
ओमकार शामधन सिंघल (वय २२ वर्ष), रा. संतोषीमाता नगर, मुकुंदवाडी, छत्रपती संभाजीनगर
ओमकार गिरीजाशंकर शेळके (वय १९ वर्ष), रा. धनगर पिंप्री, ता. अंबड, जि. जालना
भारतीय हत्यार कायद्यान्वये गुन्हे दाखल या प्रकरणी पोलीस हेड कॉन्स्टेबल प्रशांत देशमुख आणि कृष्णा तंगे यांच्या फिर्यादीवरून दोन्ही आरोपींविरुद्ध भारतीय हत्यार कायदा कलम ४/२५ अंतर्गत स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.
जप्त करण्यात आलेले खंजिर ताब्यात घेऊन पोलिसांनी पुढील तपास सुरू केला आहे. आरोपींनी ही शस्त्रे कुठून आणली, त्यांचा वापर कोणत्या उद्देशाने करण्यात येणार होता आणि त्यामागे आणखी कोणी सहभागी आहे का, याचा तपास पोलीस करीत आहेत.
वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वी कारवाई
ही कारवाई जालना जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक , अप्पर पोलीस अधीक्षक आणि उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.पोलीस निरीक्षक बाळासाहेब पवार यांच्या नेतृत्वाखाली सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक मनसुब वेताळ, पोहेकॉ प्रशांत देशमुख, कृष्णा तंगे, रविंद्र (पान २ वर)

# टेंभुर्णी चे आदर्श शिक्षक शेख जमीर यांचा आदर्शवत उपक्रम, जुन्या सहकाऱ्यांना व अधिकाऱ्यांना भेटून नवा उत्साह निर्माण करण्याचा प्रयत्न

**दत्ता देशमुख**
''ते आता काय करतात सेवानिवृत्तीनंतर?'' या एकाच प्रश्नाने ४० वर्षांपूर्वीचा काळ पुन्हा जिवंत केला आहे. राज्यपालांच्या हस्ते आदर्श शिक्षक म्हणून गौरवण्यात आलेले टेंभुर्णीचे शेख जमीर गुरुजी यांनी आपल्या जुन्या सहकारी शिक्षकांना सोबत घेऊन थेट छत्रपती संभाजीनगर गाठले.





तिथे मुलांकडे स्थायिक झालेल्या आणि सन १९८७-८८ मध्ये जालना जिल्हा परिषद शाळेत सोबत काम केलेल्या सेवानिवृत्त शिक्षक मधुकर जोशी गुरुजींची त्यांनी अत्यंत आपुलकीने भेट घेतली.
सेवानिवृत्तीनंतर अनेक शिक्षक शहरात मुलांकडे राहायला जातात. नोकरीतले मित्र दुरावल्यामुळे आपण कोणी होतो याची जाणीव हळूहळू पुसट होऊ लागते. हे पोरकेपण आणि एकटेपण दूर व्हावे,
म्हणून शेख जमीर गुरुजी आवर्जून जुन्या गुरुजींना आणि मार्गदर्शकांना त्यांच्या घरी जाऊन भेटतात. ''तुम्ही आता काय करता? तब्येत कशी आहे?'' या साध्या प्रश्नातून जुन्या आठवणींना उजाळा देत तुम्ही आजही गुरुजीच आहात असा धीर ते देतात.
या भेटीमध्ये नाना देशमुख गुरुजी, नवले गुरुजी यांसारखे १९८६-८७ मधील जुने सहकारी मित्रही सामील झाले होते.
सर्वांनी मिळून मनमोकळ्या गप्पा मारल्या. यावेळी आजचे शिक्षक आणि तत्कालीन शिक्षक या विषयावर गप्पांची मैफल चांगलीच रंगली होती. शेख जमीर गुरुजी स्वतः शांत स्वभावाचे आणि विद्यार्थीप्रिय शिक्षक म्हणून ओळखले जातात. राज्यपालांनी त्यांचा आदर्श शिक्षक म्हणून सन्मान केला असला, तरी ते या सन्मानात अडकून पडले नाहीत. निवृत्तीनंतरही आपले जुने गुरुजी, सहकारी आणि मार्गदर्शक यांना न विसरता, त्यांना भेटून जुन्या आठवणी ताज्या करण्याचे काम ते सातत्याने करत आहेत.
सेवानिवृत्ती ही केवळ नोकरीतून असते, नात्यातून नाही, असाच संदेश शेख जमीर गुरुजी आपल्या या उपक्रमातून समाजाला देत आहेत. मोठं झाल्यावर ज्यांनी आपल्याला घडवलं त्यांना कधीच विसरायचं नसतं, कारण गुरुजी निवृत्त होतो, पण त्याचे गुरुजीपण कधीच निवृत्त होत नाही.
शेख सरांचा हा उपक्रम सर्वांनाच भावून जात आहे. त्यांच्या या उपक्रमांमधून जुन्या सहकाऱ्यांना निवृत्तीनंतर एक प्रकारचा उत्साह निर्माण करण्याचा हा प्रयत्न आदर्शवत उपक्रमासारखाच आहे. या आदर्शवत उपक्रमातूनच त्यांनी एक नात्याची माळ गुंफली आहे.
ते सर्वांनाच हवे हवे असे वाटत असतात आणि सर्वांनाच भेटल्यानंतर एक प्रकारचा हुरूप येतो. ते जसे शिक्षकांना भेटत असतात तसेच त्यांच्या नाट्यकलेतील सर्वच सहकाऱ्यांना नेहमीच भेटत असतात आणि त्यांच्यामध्ये उत्साह निर्माण करण्याचा प्रयत्न करत असतात. भाई मिया म्हणून परिचित. आपल्या नाट्यकलेतील जुन्या सहकार्यांना जेव्हा ते भेटतात तेव्हा त्यांच्या मधला मित्र जागा होतो. आणि ते आपल्या लहान भावाप्रमाणे सर्वांना महत्त्व देत असतात.

## एकल महिलांच्या स्वतंत्र धोरणासाठी समिती स्थापन; महाराष्ट्र ठरणार देशातील पहिले राज्य

**परतुर - प्रतिनिधी**
राज्यातील एकल महिलांच्या प्रश्नांवर स्वतंत्र धोरण ठरवण्यासाठी महाराष्ट्र शासनाने मसुदा समिती स्थापन केली आहे.



महिला व बालकल्याण आयुक्त यांच्या अध्यक्षतेखालील या समितीत विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी तसेच साऊ एकल महिला समितीचे राज्य निमंत्रक हेरंब कुलकर्णी यांचा समावेश आहे. या निर्णयाचे साऊ एकल महिला समितीच्या जिल्हा समन्वयक नूतन मघाडे एकनाथ राउत तयब पठाण यांनी स्वागत करून शासनाचे अभिनंदन केले आहे.
२०११ मध्ये राज्यातील एकल महिलांची संख्या ५४ लाख होती, ती आता सुमारे ७० लाखांपर्यंत पोहोचल्याने स्वतंत्र धोरणाची गरज निर्माण झाली होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अर्थसंकल्पीय भाषणात याची घोषणा केली होती. त्यानंतर महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे व राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांच्या पुढाकाराने समिती स्थापन करण्यात आली. ही समिती विविध विभाग, अधिकारी व संस्थांशी चर्चा करून एकल महिलांसाठी सर्वसमावेशक धोरण तयार करणार असून त्यामुळे त्यांच्या प्रश्नांबाबत शासन अधिक संवेदनशील होईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## ''सिपेट'' अभ्यासक्रमासाठी ऑनलाइन प्रवेश अर्ज भरण्याची अंतिम मुदत ३१ मे

**छत्रपती संभाजीनगर - प्रतिनिधी**
: केंद्रीय पेट्रोरसायन अभियांत्रिकी व प्रौद्योगिकी संस्थान (), छत्रपती संभाजीनगर येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी विविध प्लास्टिक्स अभियांत्रिकी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी ऑनलाइन अर्ज प्रक्रिया सुरू झाली असून प्रवेश अर्ज भरण्याची अंतिम मुदत ३१ मे २०२६ आहे. इच्छुक विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन संस्थेचे निदेशक व प्रमुख ए. के. राव यांनी केले आहे. दरवर्षी ऑल इंडिया स्तरावर घेतल्या जाणाऱ्या () च्या माध्यमातून गुणवत्तेनुसार प्रवेश दिला जातो. यावर्षी प्रवेश परीक्षा ७ जून २०२६ रोजी होणार असून परीक्षेसाठी नोंदणी २६.. येथे सुरू आहे. सिपेट, छत्रपती संभाजीनगर येथे दहावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी डिप्लोमा इन प्लास्टिक टेक्नॉलॉजी () आणि डिप्लोमा इन प्लास्टिक मोल्ड टेक्नॉलॉजी () हे तीन वर्षांचे अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. तसेच बी.एस्सी. उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन प्लास्टिक प्रोसेसिंग अँड टेस्टिंग (-) हा दोन वर्षांचा अभ्यासक्रम सुरू आहे. अभियांत्रिकी डिप्लोमा पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांसाठी पोस्ट डिप्लोमा इन प्लास्टिक मोल्ड डिझाइन (-) हा १८ महिन्यांचा अभ्यासक्रम उपलब्ध आहे.
केंद्रीय पेट्रोरसायन अभियांत्रिकी व प्रौद्योगिकी संस्थान () ही संस्था महाराष्ट्रातील प्लास्टिक्स उद्योगांना तांत्रिक सहाय्य, कुशल मनुष्यबळ निर्मिती तसेच संशोधन व विकासकार्याला चालना देण्याच्या उद्देशाने २००६ मध्ये छत्रपती संभाजीनगर येथे स्थापन करण्यात आली. संस्थेला ९००१:२०१५ मानांकन प्राप्त असून येथे मान्यताप्राप्त व समतुल्य प्लास्टिक्स अभियांत्रिकी अभ्यासक्रम राबविले जातात.
संस्थेत जागतिक दर्ज्याचे कॅड/कॅम, टूल रूम, प्लास्टिक प्रोसेसिंग आणि प्लास्टिक टेस्टिंग विभाग कार्यरत असून आधुनिक यंत्रसामग्रीच्या साहाय्याने उद्योगांना तांत्रिक सहाय्य तसेच विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक आधारित प्रशिक्षण दिले जाते.
रोजगार व स्वयंरोजगार लक्षात घेऊन तयार करण्यात आलेल्या अभ्यासक्रमांमुळे विद्यार्थ्यांसाठी रोजगाराच्या मोठ्या संधी उपलब्ध होत असल्याचे संस्थेकडून सांगण्यात आले.

# मोबाईल स्फोटात विद्यार्थ्याचे भविष्य धोक्यात, रियलमी कंपनीला दीड लाखांचा दंड

**जालना - प्रतिनिधी**
जिल्हा ग्राहक विवाद निवारण आयोगाने एका महत्त्वपूर्ण निकालात, सदोष मोबाईलमुळे झालेल्या नुकसानीबद्दल रियलमी मोबाईल कंपनीला चांगलाच दणका दिला आहे. मोबाईलच्या स्फोटामुळे शारीरिक इजा झालेल्या आणि आपली महत्त्वाची यू.पी.एस.सी परीक्षा मुकलेल्या विद्यार्थ्याला दीड लाख रुपयांची नुकसान भरपाई देण्याचे आदेश आयोगाने दिले आहेत. ग्राहक हक्कांसाठी लढणाऱ्या प्रत्येकासाठी हा निकाल एक आशेचा किरण असल्याचे मत नोटरी असोसिएशनचे कार्याध्यक्ष ॲड. महेश एस धन्नावत यांनी व्यक्त केले आहे.
या प्रकरणातील तक्रारदार, कोटी साई पवन, हा एक होतकरू विद्यार्थी यू.पी.एस.सी परीक्षेची तयारी करण्यासाठी दिल्लीत आला होता. त्याने ६ ऑक्टोबर २०१९ रोजी रियलमी एक्सटी मॉडेलचा मोबाईल १८,००० रुपयांना विकत घेतला होता. ५ जून २०२२ रोजी त्याची यू.पी.एस.सी पूर्व परीक्षा होती. मात्र, परीक्षेच्या आदल्या रात्री, म्हणजेच ४ जून रोजी पहाटे ३ वाजता, त्याच्याजवळ ठेवलेल्या मोबाईलचा अचानक स्फोट झाला आणि त्याला आग लागली. या दुर्घटनेत पवनच्या डाव्या हाताला, कपाळाला भाजले आणि दोन्ही हातांच्या बोटांना फोड आले.
या घटनेमुळे त्याला शारीरिक आणि मानसिक धक्का बसला, ज्यामुळे तो परीक्षेला बसू शकला नाही. पवनने कंपनीच्या सर्व्हिस सेंटरमध्ये धाव घेतली असता, त्यांनी मोबाईल दुरुस्त करून देण्याचे सांगितले, परंतु त्यासाठी हे नुकसान वापरकर्त्याच्या चुकीमुळे झाले आहे अशा आशयाच्या कागदपत्रावर सही करण्याची अट घातली. पवनने ही अन्यायकारक अट मानण्यास नकार दिला. त्यानंतर त्याने ग्राहक आयोगाकडे धाव घेतली. ग्राहक तक्रार क्रमांक डीसी/७७/सीसी/१२०/२०२२ अंतर्गत दाखल झालेल्या या खटल्यात, रियलमी कंपनीने आपले लेखी म्हणणे मांडले, परंतु आपल्या बचावासाठी कोणताही पुरावा सादर केला नाही. त्यामुळे आयोगाने तक्रारदाराचे म्हणणे आणि त्याने सादर केलेले पुरावे, जसे की जळालेल्या मोबाईलचे फोटो, वैद्यकीय अहवाल आणि परीक्षेचे प्रवेशपत्र, ग्राह्य धरले. आयोगाने आपल्या निकालात स्पष्ट केले की, कंपनीने सदोष आणि निकृष्ट दर्जाचा मोबाईल विकून ग्राहकाच्या सुरक्षेशी खेळ केला आहे.
या स्फोटामुळे केवळ तक्रारदाराचे आर्थिक आणि शारीरिक नुकसान झाले नाही, तर त्याचे वर्षभराचे परिश्रम आणि करिअरची एक मोठी संधीही वाया गेली. कंपनीचा ग्राहकांप्रति असलेला निष्काळजीपणा अत्यंत गंभीर असल्याचे ताशेरे ओढत आयोगाने रियलमी कंपनीला शारीरिक व मानसिक त्रासासाठी १,००,००० रुपये, नुकसानीपोटी २५,००० रुपये आणि कायदेशीर खर्चासाठी २५,००० रुपये, असे एकूण १,५०,००० रुपये ६% व्याजासह देण्याचे आदेश दिले.
या निकालावर प्रतिक्रिया देताना नोटरी असोसिएशनचे कार्याध्यक्ष ॲड. महेश एस धन्नावत म्हणाले, ''हा निकाल म्हणजे ग्राहक राजाच्या विजयाचे प्रतीक आहे.
मोठ्या कंपन्या अनेकदा ग्राहकांना कमी लेखतात आणि आपल्या चुकांचे खापर ग्राहकांवरच फोडण्याचा प्रयत्न करतात.
या निकालातून महाराष्ट्र आणि विशेषतः जालना जिल्ह्यातील नागरिकांनी बोध घेतला पाहिजे. आपल्यासोबत अन्याय झाल्यास, घाबरून न जाता ग्राहक संरक्षण कायदा, २०१९ अंतर्गत आपले हक्क बजावले पाहिजेत. पुरावे जपून ठेवा आणि अन्यायाविरोधात आवाज उठवा. कंपन्यांनीही हे लक्षात ठेवावे की, ग्राहकांच्या जीवाशी खेळ करून आणि सदोष उत्पादने विकून ते कायद्याच्या कचाट्यातून सुटू शकत नाहीत.''

# जालना जिल्ह्यातील दामिनी पथक अधिक सक्षम व प्रभावी करण्याची मागणी

**जालना - प्रतिनिधी**
जालना जिल्ह्यात ग्रामीण भागासह जालना शहरात महिला व मुलींच्या सुरक्षेच्या दृष्टीने कार्यरत असलेल्या ''दामिनी पथका''ला अधिक सक्षम व प्रभावी करण्यात यावे, अशी मागणी राष्ट्रवादी युवती काँग्रेसच्या जिल्हाध्यक्ष सौ. शीतलताई बारोटे यांनी जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे निवेदनाद्वारे केली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष अरविंदराव चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा पोलीस अधीक्षक यांना निवेदन देण्यात आली
ग्रामीण भागासह जालना शहरात शाळा, महाविद्यालये, बसस्थानके, रेल्वे स्टेशन तसेच सार्वजनिक ठिकाणी महिलांची मोठ्या प्रमाणावर वर्दळ असते. अशा ठिकाणी महिला छेडछाड, अत्याचार व इतर अनुचित प्रकारांना प्रतिबंध घालण्यासाठी दामिनी पथकाची गस्त वाढविण्याची मागणी निवेदनात करण्यात आली आहे.
तसेच प्रत्येक तालुक्यात महिला पथक सक्रिय करून महिलांच्या तक्रारींवर तात्काळ कारवाई करण्यात यावी, अशी मागणीही करण्यात आली. महिलांच्या



सुरक्षेविषयी जनजागृती करण्यासाठी शैक्षणिक संस्थांमध्ये मार्गदर्शन शिबिरे व महिला सुरक्षा हेल्पलाईनची माहिती देण्याची सूचनाही निवेदनात करण्यात आली आहे.
जिल्ह्यातील महिलांना सुरक्षित वातावरण मिळावे आणि महिलांविरोधातील गुन्ह्यांना आळा बसावा, यासाठी प्रशासनाने तातडीने आवश्यक ती पावले उचलावीत, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

# जालना शहरात राज्यस्तरीय कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिराचे आयोजन

**जालना- प्रतिनिधी**
जालना शहरात कृषी विज्ञान केंद्र खरपुडी येथे पीस फाउंडेशन तर्फे राज्यस्तरीय कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात प्रामुख्याने शासनाच्या विविध योजनांची माहिती देण्यात आली.



उपस्थित जालना जिल्ह्याच्या उपजिल्हाधिकारी माननीय पगार मॅडम यांनी झाडाला पाणी घालून कार्यक्रमाचे उद्घाटन केले प्रमुख उपस्थिती म्हणून डॉ. आर्कि. अर्षद शेख (अध्यक्ष पीस फाउंडेशन महाराष्ट्र राज्य) मा. करण पवार सर (आयुक्त अल्पसंख्यांक आयुक्तालय), श्री विजय अण्णा बोराडे (सचिव शेती सहाय्य मंडळ जालना) मा. आलम खान कोटकर तसेच मिर्झा अफसर बेग (मराठवाडा समन्वयक पीस फाउंडेशन) यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम यशस्वीरित्या संपन्न झाला.
शिबिरामध्ये प्रामुख्याने शासनाच्या विविध विभागाचे अधिकारी यांनी मोलाचे मार्गदर्शन केले त्यात प्रामुख्याने व्ही . एन .कायदे (जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी जालना), शाम राठोड (जिल्हा आरोग्य विभाग जालना), डॉ. पंडित वासरे (शास्त्रज्ञ कृषी विज्ञान केंद्र खरपुडी) मा. करण पवार (समाज कल्याण अधिकारी जालना), मा. प्रकाश पडोळ (जिल्हा व्यवस्थापक मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळ जालना) अशा विविध विभागांचे अधिकाऱ्यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. उपजिल्हाधिकारी पगारे मॅडम यांनी आपल्या भाषणात शासनाच्या विविध खात्यांची माहिती देत समाजातील दुर्बल घटकांचा विकास व्हावा यासाठी मोलाचे मार्गदर्शन केले तसेच अध्यक्षीय भाषण डॉक्टर आर्किटेक अर्षद शेख यांनी समाजातील जातीयता ,अंधश्रद्धा ,सामाजिक समस्या अशा विविध पैलूवर प्रकाश टाकत व्यक्तिमत्व विकास कसा साधावा याची प्रशिक्षण दिले.
हे शिबिर यशस्वीरित्या संपन्न होण्यासाठी अब्दुल वहीद सर (माजी शिक्षणाधिकारी) मिर्झा कैसर, मिर्झा, ओझर, शेख नईम , युसुफ बागवान, शेख कयूम ,इंजि. मोईन , फारूख गाझी, सय्यद सिराज , वकील मोईन सर याच बरोबर कृषी विज्ञान केंद्राचे सर्व सदस्यांनी मोलाचे सहकारी केले.
कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. बिस्मिल्ला सैय्यद सर यांनी केले व आभार प्रदर्शन मिर्झा अफसर बेग यांनी करत सर्वांच्या आभार मानून शिबिराची सांगता केली.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.